सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, राजगुरू हुतात्मा चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ३० डिसेंबर २०२५

### ‘दिलखुलास’ आणि ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात राज्य निवडणूक आयुक्तांची शनिवारपासून मुलाखत

मुंबई, दि. ३० (रानिआ): राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विशेषत: महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित आकाशवाणीवरील ‘दिलखुलास’ कार्यक्रमात ३, ५ आणि ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत; तसेच दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ६ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८ वाजता प्रसारित होणार आहे.

आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. ‘न्यूज ऑन एअर’ या मोबाईल ॲपवरही ती उपलब्ध असेल. याशिवाय दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीबरोबरच ही मुलाखत राज्य निवडणूक आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही उपलब्ध असणार आहे. निवेदिका स्मिता गव्हाणकर यांनी घेतलेल्या या मुलाखतीत श्री. वाघमारे यांनी महानगरपालिका निवडणुकांच्या तयारी संदर्भात सविस्तर माहिती दिली. मनुष्यबळ व्यवस्थापन, मतदान केंद्रांची संख्या, ईव्हीएमची उपलब्धता, दुबार मतदारांबाबत घेतली जाणारी दक्षता, ‘मताधिकार’ मोबाईल ॲप, प्रचार कालावधी, मतदार जागृती बहुसदस्यीय पद्धतीनुसार मतदानाची प्रक्रिया इत्यादींसंदर्भातील तपशीलवार माहिती या मुलाखतीच्या माध्यमातून कळू शकेल.

०-०-०